महाराष्ट्र शासन
सांस्कृतिक कार्य संचालनालय
जुने सचिवालय, पहिला मजला, विस्तार भवन, महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ०३२
वेबसाईट- www.mahasanskruti.org ई-मेल- mahaculture@gmail.com
दूरध्वनी क्र- ०२२: २२८४२६७०/३४, २२०४३५५०/७१

क्रमांक:सांकासं/आस्था-२/ ७१२७. दिनांक 21 DEC 2023

## जाहिर निवेदन

रंगभवन खुले नाट्यगृह, धोबीतलाव, मुंबई येथील वृक्षांच्या फांद्या छाटणी, कोटेरी झुडपे, गवत काढण्याच्या कामासाठी खालीलप्रमाणे दरपत्रके मागविण्यात येत आहेत. कामाचे स्वरूप खालील तक्त्यात नमूद करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | एकूण रक्कम (जी.एस.टी.सह) |
|---|---|---|
| १. | **ठिकाण: रंगभवन खुले नाट्यगृह, धोबीतलाव, मुंबई**<br>रंगभवन खुले नाट्यगृह, धोबीतलाव या जागेच्या परिसरातील विविध वृक्षांच्या फांद्या छाटणी करणे, काटेरी झुडपे तोडणे, गवत काढणे इत्यादी | |

तरी इच्छुक कंपन्या, व्यक्ती यांनी आपले दर नमुन्याबंद लिफाफ्यात दि. २१ डिसेंबर, २०२३ ते २८ डिसेंबर, २०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई या कार्यालयात सादर करावेत. कार्यालयीन वेळेनंतर प्राप्त झालेली दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत. सर्व दरपत्रकातील दर भरताना सर्व कर अंतर्भूत करुन दर भरण्यात यावेत.

प्राप्त दरपत्रके कोणत्याही कारणाशिवाय स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार मा.संचालक, सांस्कृतिक कार्य यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे.

S/d
संचालक,
सांस्कृतिक कार्य संचालनालय,मुंबई

# सुचना

सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई हे रंगभवन खुले नाट्यगृह, धोबीतलाव, मुंबई येथील वृक्षांच्या फांद्या छाटणी, कोटेरी झुडपे, गवत काढण्याच्या कामासाठी खालीलप्रमाणे दरपत्रके मागवित आहेत. औषध फवारणीचे स्वरूप खालील तक्त्यात नमूद करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | एकूण रक्कम (जी.एस.टी.सह) |
|---|---|---|
| २. | **ठिकाण: रंगभवन खुले नाट्यगृह, धोबीतलाव, मुंबई**<br>रंगभवन खुले नाट्यगृह, धोबीतलाव या जागेच्या परिसरातील विविध वृक्षांच्या फांद्या छाटणी करणे, काटेरी झुडपे तोडणे, गवत काढणे इत्यादी | |

तरी इच्छुक कंपन्या, व्यक्ती यांनी आपले दर नमुन्याबंद लिफाफ्यात दिनांक २१ डिसेंबर, २०२३ ते २८ डिसेंबर, २०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात सादर करावेत. कार्यालयीन वेळेनंतर प्राप्त झालेली दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.

सर्व दरपत्रकातील दर भरताना सर्व कर अंतर्भूत करुन दर भरण्यात यावेत.

प्राप्त दरपत्रके कोणत्याही कारणाशिवाय स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार मा.संचालक, सांस्कृतिक कार्य यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे.

S/d
संचालक,
सांस्कृतिक कार्य संचालनालय,मुंबई

**रंगभवन खुले नाट्यगृह, धोबीतलाव, मुंबई येथील वृक्षांच्या फांद्या छाटणी, कोटेरी झुडपे, गवत काढण्यासाठी व इतर अनुषंगिक कामासाठी अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.**

१. कामाचे दर हे सर्व करासह देण्यात यावेत.
२. वृक्षांच्या फांद्या छाटणी करताना मूळ वास्तूस कोणतीही इजा पोहचणार नाही याची दक्षता घ्यावी. कारण सदरील वास्तू व परिसर हे हेरिटेज दर्जा प्राप्त आहेत.
३. फांद्या छाटणी, काटेरी झुडपे तसेच गवत काढणी करताना कामगारास कोणत्याही प्रकारे इजा पोहचल्यास संचालनालय जबाबदार राहणार नाही.
४. सदर कामाच्या वेळी संस्थेची यंत्रे खराब झाल्यास अथवा मोडल्यास संचालनालय जबाबदार राहणार नाही.
५. पुरवठादारने दरपत्रक त्यांच्या लेटर हेडवर द्यावे, सोबत पॅन व असल्यास जी.एस.टी. रजिस्ट्रेशन झेरॉक्स प्रत सोबत जोडावी.
६. रंगभवन खुले नाट्यगृह धोबीतलाव येथील परिसराची पाहणी करूनच दरपत्रके सादर करावे.
७. वृक्ष छाटणी कामाकरीता सक्षम प्राधिकारी यांचा आवश्यक परवाना असणे आवश्यक आहे.
८. काम असमाधानकारक आढळल्यास सदर करार रद्द करण्याचे अधिकार संचालक, सांस्कृतिक कार्य यांना राहतील.
९. भविष्यात आवश्यकतेनुसार काही अटी व शर्ती करारामध्ये नव्याने समाविष्ट करावयाचे झाल्यास तसे करण्याचा अधिकार संचालक, सांस्कृतिक कार्य यांना राहील. यासाठी विहित पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.
१०.करार कालावधीमध्ये दरात कोणतेही बदल ठेकेदारास करता येणार नाही.
११.या कार्यालयाशी केलेली करार मध्येच एकतर्फी खंडीत करता येणार नाही.
१२.वास्तूवरील वनस्पती काढताना शास्त्रीय पध्दतीचा वापर करावा कारण त्यामुळे वास्तूला इजा पोहचू शकते.
१३.फांद्या, पालापाचोळा आणि अन्य घनकचारा याची योग्य ठिकाणी विल्हेवाट लावण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची असेल.
१४.सर्व कामे सुर्योदयापासून ते सुर्यास्ताच्या वेळेपर्यंत करण्यात यावीत.
१५.काम करण्यासाठी विद्युत जोडणी नसल्याने त्यासाठी स्वत: तरतूद करावी.
१६. सदर परिसर शांतता क्षेत्रात येत असल्याने ५० डेसिबल पेक्षा जास्त आवाज होणार नाही याची दक्षता घ्यावी.

वरील सर्व अटी व शर्ती विचारात घेऊन सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई या कार्यालयातील हे रंगभवन खुले नाट्यगृह, धोबीतलाव, मुंबई येथील वृक्षांच्या फांद्या छाटणी, कोटेरी झुडपे, गवत काढण्याच्या कामासाठी दरपत्रक दि. २८ डिसेंबर, २०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (शासकीय सुट्टया सोडून) मोहोरबंद लिफाप्यात संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, पहिला मजला, जुने सचिवालय, महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ०३२ येथे पाठवाव्यात किंवा प्रत्यक्ष जमा करावीत. मुदतीनंतर आलेली दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक:**
**ठिकाण:** मुंबई

S/d
**संचालक,**
**सांस्कृतिक कार्य संचालनालय,मुंबई**